P-P 2021

ISSN NO: 2249-6661(PRINT)

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

# SAMBODHI

A Quarterly Peer Reviewed, Refereed Research Journal
Vol-43 No.03(IX) July - September 2020
UGC Care Listed Journal

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani

L.D. INSTITUTE OF INDOLOGY

Scanned with OKEN Scanner

Sambodhi
(UGC Care Journal)
ISSN: 2249-6661
Vol-43, No.-03 (IX) July-September (2020)

# संत जनाबाईचे संत साहित्यातील योगदान

डॉ.राजाराम अं. झोडगे
मराठी विभागप्रमुख, नूतन महाविद्यालय,सेलू जि.परभणी.

मध्ययुगीन काळात उदयास आलेल्या विविध भक्तीसंप्रदायांनी वर्ण, लिंग, जाती, सामाजिक स्थान यांच्या पलीकडे जाऊन प्रत्येकाचा ईश्वरभक्तीचा अधिकार आणि सामाजिक समरसता यांचा पुरस्कार केला. या संप्रदायाचे साहित्य हे सामाजिक, धार्मिक विषमतेच्या विरोधात बंड पुकारणारा एक लढा होता. वारकरी संप्रदायात आपणास अठरापगड जातींमधील संत दिसून येतात. वारकरी संप्रदायातील प्रबोधनाचा विचार आणि त्यातून निर्माण झालेली अध्यात्मिक, सामाजिक लोकशाही यामुळे वेगवेगळ्या जाती – धर्मातील पुरुषांबरोबरच तत्कालीन समाजव्यवस्थेत निम्न दर्जा असलेल्या स्त्रियांच्या साहित्य लेखनाची परंपरा निर्माण झाली या स्त्री संत परंपरेत महदंबा, मुक्ताबाई यांच्यानंतर संत जनाबाईचे स्थान महत्त्वपूर्ण आहे.

'नामयाची दासी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संत जनाबाई तेराव्या शतकातील एक प्रतिभासंपन्न कवयित्री होत. शूद्र कुळातील जन्मामुळे हक्कांचा झालेला संकोच, पोरकेपणाचे दुःख वाट्याला आलेले आणि दासीचे काम अशा तिहेरी मर्यादांवर मात करत जनाबाईंनी मराठी संतसाहित्यात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. आज जनाबाईचे जवळपास 350 अभंग उपलब्ध आहेत. त्यांनी यापेक्षा अधिक अभंगरचना केलेली असण्याची शक्यता असून ते कालौघात उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. संत जनाबाईंच्या साहित्याचे अभ्यासक डॉ. दा. बा. भिंगारकर यांनी जनाबाईंच्या आज उपलब्ध असलेल्या अभंगांशिवाय विविध ठिकाणी उपलब्ध झालेल्या हस्तलिखित बाडांमधील 43 अप्रकाशित अभंग जनाबाईचे असल्याचा दावा केला आहे.

संत जनाबाईंच्या अभंगात विविधता आहे. विठ्ठलाचे महात्म्य, भारतीय, करुणा, नामाचा महिमा, संतांची स्तुती, जाते,उपदेश, संतांची चरित्रे, कूट, तीर्थावळी, कृष्णजन्म बाळक्रीडा अशा अनेक विषयांवर त्यांनी अभंग रचना केली. त्यांच्या अभंगांच्या आशय विषयांबरोबरच त्यांच्या रचना पद्धतीतही वैविध्य आहे. त्यांनी भक्तिपर अभंग तर गायलेच शिवाय चरित्र आख्यानकाव्य, पदे, भारुड, कूट अशा प्रकारांतही त्यांची प्रतिभा तळपत राहिली.

वारकरी संप्रदायातील सर्वच संतांचे पंढरीच्या विठ्ठलाशी एक अंतरीचे नाते आहे. जनाबाईंचा तर विठ्ठल हा श्वास होता. जनाबाईंच्या अभंगातून त्यांच्या विठ्ठलाशी असणाऱ्या अतूट नात्याचा, आत्मीयतेचा संबंध सहज लक्षात येणारा आहे. आज त्यांच्या उपलब्ध असणाऱ्या अभंगांपैकी जवळपास दीडशे अभंग विठ्ठल भक्तीपर आहेत. पोरकेपणा वाट्याला आल्यानंतर

*'माय मेली बाप मेला आता सांभाळी विठ्ठला किंवा*
*'तुजविण रे विठ्ठला कोणी नाही रे मजला*

अशा अभंगांतून जनाबाईंनी विठ्ठलालाच आपले सर्वस्व मानले आहे. जनाबाईचे पोरकेपण विठ्ठलालाही अस्वस्थ करते.विठ्ठल रुक्मिणीपाशी आपले मनोगत व्यक्त करतात.

*'विठ्ठल म्हणे रुक्मिणी माझे जनीला नाही कोणी*
*हाती घेऊनी तेल फणी केस विंचरून घाल वेणी'*

जनाबाई संत नामदेवांच्या घरची दासी असल्याने तिला झाडलोट करणे, दळणे, गोवऱ्या वेचणे आदी कामे करावी लागतात अशा कामांत विठ्ठल त्यांना मदत करतो.

*झाडलोट करी जनीच्ये केर भरी चक्रपाणी।*
*पाटी घेऊनी डोईवरी। नेऊनिया टाकी दुरी।*
*ऐसा भक्तांसी भुलला।नीच कामे करू लागला।*
*जनी म्हणे, बा विठ्ठला।कारा उतराई होऊ तुला।।*

यातून जनाबाईंचे विठ्ठलाशी असणारे नाते, प्रेम, सख्य प्रतीत होते.

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

Copyright © 2020 Authors



Scanned with OKEN Scanner

NUTAN MAHAVIDYALAYA SELU

ISSN: 2249-6661
Sambodhi
(UGC Care Journal)
Vol-43, No.-03 (IX) July-September (2020)

जनाबाईंची विठ्ठलावर श्रद्धा,भक्ती आहे. विठ्ठलालाच आपले सर्वस्व मानताना त्यांनी आपल्या अभंगातून प्रेम,वत्सल, करूणाभावाने मृदू भाषेत आळवणी केली आहे तर कधी कधी रागाच्या भरात विठ्ठलाशी त्या भांडतांनाही दिसतात.

*'अरे विठ्या विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या।*
*तुझी रांड रंडकी झाली। जन्म सावित्री चुडा त्याली।*

तुझे गेले मढे। तुला पाहून काळ रडे। उभी राहून अंगणी। शिव्या देत दासी जनी।। अशा अभंगातून जनाबाईंचा अधिकार आणि त्यांच्या तिखट भाषेचा प्रत्यय येतो.

संतांची चरित्रे ही जनाबाईंची संत साहित्याला लाभलेली एक महत्त्वाची देण आहे. नामदेवांप्रमाणे जनाबाईंनी ही संतचरित्रे लिहिली.संत नामदेव, ज्ञानेश्वर, पुंडलिक, चोखामेळा, सेना न्हावी, गोरा कुंभार, सोपानदेव या संतांची चरित्रे त्यांनी अभंगबद्ध केली आहेत.संत ज्ञानेश्वरांचा मोठेपणा, ज्ञानेश्वरीबद्दलचा आदरभाव आणि त्यांचा समाधीकाळ इ.च्या नोंदी जनाबाईंच्या अभंगात आहेत. संत चोखामेळा यांना अस्पृश्य म्हणणारे व त्यांचा विटाळ मागणाऱ्यांना जनाबाई अभंगातून सुनावतात.

*'कीर्तनाचा द्वेष।करी जो चांडाळ। तयाचा विटाळ। मातंगीसी।।*
*वैष्णव तो एक। चोखा मेळा महार। जनी म्हणे निर्धार। केला संती।।*

चोखा हा खरा वैष्णव आहे. विठ्ठलभक्त आहे.विटाळ तर त्यांचा होतो जे हरीकीर्तनाचा, विठ्ठलाचा द्वेष करतात. यातून जनाबाईंचा समतावादी दृष्टिकोनही समोर येतो. जनाबाईंचे भक्त पुंडलिक, सोपानदेव, सेना न्हावी, गोरा कुंभार यांच्या चरित्रपर असलेले अभंगही उल्लेखनीय आहेत. संतांनी लिहिलेले आत्मपर अभंग आणि अन्य संत कवींनी त्यांच्या चरित्रपर केलेल्या रचना या मध्ययुगीन काळातील संत,महानुभावांच्या चरित्रांच्या माहितीचे महत्त्वाचे दुवे ठरतात. यादृष्टीने जनाबाईंचे चरित्रपर अभंग संतसाहित्यात मोलाची भर घालणारे आहेत.

चरित्राबरोबरच जनाबाईंनी आख्यानकाव्येही रचलेली आहेत. थालीपाक व हरिश्चंद्राख्यान ही आख्यानकाव्ये वाड्.मयीनदृष्ट्या सरस आहेत. पुराणग्रंथातील कथानकावर आधारित ही आख्याने जिवंत व्यक्तीचित्रण, वर्णनशैली आणि अद्भुतरस, भक्तिरस, करुणरस,रौद्ररस, हास्यरस यांनी ओथंबलेली असून जनाबाईंच्या तल्लख प्रतिभाशक्तीचा प्रत्यय आणून देणारी आहेत.त्यांचे तीर्थावळीचे अभंग,रूपक, कूट, पाळणा, काकड आरती इत्यादी प्रकारांतील अभंगही संख्येने कमी असले तरी उत्कट भावानुभूतीची प्रचिती देणारे आहेत.

अध्यात्म,भक्ती,आत्मशोध यांबरोबरच प्रबोधन हे संत साहित्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य राहिलेले आहे. संत नामदेव, ज्ञानदेव, तुकाराम यांच्यापासून ते अलीकडच्या काळातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्यापर्यंत संत साहित्यातील प्रबोधनाची परंपरा आपणास सांगता येते. संत जनाबाईंच्या अभंगातही हा प्रबोधनाचा धागा सापडतो. जनाबाईंचे उपदेशपर 30 अभंग उपलब्ध आहेत. वारकरी संप्रदायातील सर्वच संतांनी ईश्वरप्राप्तीसाठी कर्मकांड,जप–तप यापेक्षा नामस्मरणाला अधिक महत्त्व दिले आहे. जनाबाईंनी सुद्धा देवाला आळवण्यासाठी भक्ती हाच मार्ग सांगितला आहे.–

*'भक्ती आहे ज्याचे चित्ती। त्याला पावतो निश्चिती।*
*भाव धरा मनी। म्हणे नामयाची जनी।।*

अशा अभंगांतून देव भक्तीचा भुकेला असून ज्याच्या मनात शुद्ध भक्तिभाव आहे त्याला ईश्वर नक्की प्राप्त होतो असे त्या म्हणतात.

संत आणि देव यांच्यातील एकरूपत्व जनाबाई मांडतात. यासाठी त्या वेगवेगळे दाखले देतात. सूर्य आणि रश्मी (किरण), ध्यान आणि जप, साखर आणि गोडी, डोळे आणि बुबुळ, रोग आणि व्याधी, शांती आणि

Copyright © 2020 Authors

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU. Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner

NUTAN MAHAVIDYALAYA SELU Sambhaji

 ISSN: 2249-6661
Vol-43, No.-03 (IX) July-September (2020)

[...] माती आणि धूळ यात ज्याप्रमाणे भेद दाखवता येत नाही ते एकरूप आहेत तद्वतच संत आणि देव यांना वेगळे मानू नये. जे असा भेद करतात त्याला जनाबाई पापी,चांडाळ असे संबोधतात.

संत ज्ञानेश्वरांनीही हरिपाठात

*'संतांचे संगती। मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती। येणे पंथे।।*

या ओवीतून संतांशिवाय देव नाही हा भाव प्रकट केला आहे.

देवाच्या प्राप्तीसाठी घरदार सोडून संन्यासी होण्याची आवश्यकता नाही. 'प्रपंच करावा नेटका' हे सूत्र वारकरी संप्रदायाने दिले आहे. जनाबाईनीही

*'सुखे संसार करावा। माजी विठ्ठल आठवावा।*
*असोनिया देही नाही। छाया पुरुष जैसा पाही।।*

असे म्हणत सुखाने संसार करता करता नामस्मरणाच्या माध्यमातून विठ्ठलाला आपण प्राप्त करू शकतो असा विश्वास दिला आहे. जनाबाईनी मोक्षासाठी कर्मकांड करणाऱ्या साधकांचा आपल्या अभंगातून परखड शब्दांत समाचार घेतला आहे.

*'बांधोनिया हात गयावळ मारिती। दंड ते करिती मोक्षासाठी।।*
*गेले ते पितर मोक्षालागी तुझे।आंता देई माझे दक्षिणेसी।।*
*बापुडे केश बोडिती मिशी दाढी। मग दक्षणा हिरडी खातसे हे।।*
*फार काय सांगू मेल्याविण मुक्ती। नाही ते वांछिती स्वप्नसुख।।*

मोक्षासाठी भांबावून जाऊन फार आटापिटा करण्याची गरज नाही. सामान्यजनांनी मुक्तीसाठी प्रयत्नरत असावे परंतु, मुक्तीसाठी फार काही वेगळे करण्याची आवश्यकता नाही तर

*'न लगे गाळावे न लगे तळावे। न लगे मरावे मुक्तीसाठी।।*
*मुक्ती लागे पायां जाऊनिया पाहे। जीव आता देह जनी नाही।।*

केवळ विठ्ठलाच्या चरणांशी लीन होऊन संतांच्या संगतीत मुक्तीचा आनंद मिळू शकतो. अशा अभंगांतून त्यांनी सामान्यांचे प्रबोधन केले असून मोक्षप्राप्तीसाठी चाचपडणाऱ्या भक्तजनांना दिशा दाखवली आहे. जनाबाईंच्या उपदेशपर अभंगांबाबत डॉ. भिंगारकर म्हणतात "जनाबाईंच्या उपदेशाचे सार सांगावयाचे झाले तर शुद्ध आचार, शुद्ध विचार, उत्कट भक्ती, दया, क्षमा, शांती, वैराग्य, विवेक, भूतदया, नामस्मरण,अहंकाराचा निरास,परमेश्वरार्पण बुद्धीने केलेले कर्म व आचरण, संतसेवा, आत्मौपम्य बुद्धी या सद्गुणांचा ठेवा आत्मसात केला म्हणजे कोणताही भक्त देवत्व पावल्याशिवाय राहणार नाही."२ एकूण कर्मकांडविरहित भक्तीसाधना हे त्यांच्या विचारांचे सूत्र आहे.

जनाबाईंच्या अभंगांमध्ये स्त्रीसुलभ भावना,वात्सल्य, प्रेम, करुणा हे विशेष जसे दिसतात तसे प्रसंगी अत्यंत कठोर,उग्र स्वरूप त्यांच्या अभंगांनी धारण केलेले दिसते. पोरकेपणाचे दुःख, त्यातही स्त्री आणि दासी म्हणून असलेले अस्तित्व, तत्कालीन समाजाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन अशा अनेक पातळ्यांवर त्यांना संघर्ष करावा लागला याचे संदर्भ त्यांच्या अभंगांमध्ये येतात.

*'खडतरले आरान।त्यावर झुडतरले वसन।। किंवा*
*मोडकीशी वाज। त्यावर वाकळीची शेज।।*

असे स्वतःच्या दारिद्र्यमय जीवनाचे चित्रण त्यांच्या अभंगात येते. असे असले तरीही आपले दारिद्र्य अथवा स्त्रीत्वाचे दुःख याबाबत त्यांची काहीही तक्रार दिसत नाही.'स्त्री जन्म म्हणुनी न व्हावे उदास।'असे म्हणत त्यांनी ते स्विकारले आहे परंतु, आपले दासीपण, तथाकथित शूद्र जातीतील जन्मामुळे मिळणारे स्थान, विठ्ठलपूजेचा नसणारा अधिकार यांबाबतचे शल्य त्या बोलून दाखवतात. नामदेवांच्या घरी दासी म्हणून काम करताना त्या स्वतःला त्यांच्या कुटुंबाचा भाग मानत असल्या तरी त्या कुटुंबाने त्यांना आपला सदस्य म्हणून स्विकारले का?

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU: Dist. Parbhani

Copyright © 2020 Authors 

Scanned with OKEN Scanner

जनाबाई विठ्ठलाला म्हणतात 'राजाई गोणाई।
समाजाने भक्त म्हणून त्यांना स्विकारले का?असा प्रश्न पडतो
अखंडित तुझे पाशी। मज ठेविले दासी। नीच म्हणोनी बाहेरी।। आहे. आपले दासीपण, जात यामुळे आपणास
यातून सामाजिक विषमतेविरुद्धचा त्यांचा सूर प्रकट झाला आहे.
विठ्ठलाच्या चरणांजवळ जाता येत नाही याबाबत त्या दुःख व्यक्त करतात.

*कोण सखा तुजविण। माझे करी समाधान।।*
*दीन दीन तुझे पोटी। जनी म्हणे द्यावी भेटी।।*

विठ्ठलाची विनवणी करतात.
मला सावरणारा ,माझा सखा विठ्ठलाशिवाय कोण आहे? म्हणून त्या

विठ्ठलभेटीची अनावर ओढ आणि सामाजिक बंधनांमुळे होणारी कोंडी अशा स्थितीत एरव्ही संयत असणारा त्यांचा सूर प्रसंगी तीव्र,उग्र स्वरूप धारण करतो. विठ्ठलभेटीच्या आड येणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध त्या बंड करतात.

*डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।।*

अशा अभंगातून त्या आपल्या स्त्रीत्वाच्या सामाजिक मर्यादा, बंधने झुगारून व्यवस्थेला आव्हान देतात. डोक्यावरचा पदर हे तत्कालीन समाजाने कुलीन, शालीन स्त्रीचे मानलेले लक्षण. या सामाजिक संकेताला धक्का देत हाती टाळ–वीणा घेऊन मी पंढरीच्या पेठेत पाल मांडणार आहे. आता मला कोण मनाई करते? असे उघड, निर्भीड आव्हान जनाबाई देतात. 'झाले मी वेसवा' या संकेतातून विठ्ठलाच्या भेटीसाठी सर्व सामाजिक संकेत,बंधने झुगारून मी निघाले आहे. बंधने लादणाऱ्यांनी मनगटावर तेल घालून खुशाल बोंब मारावी. त्यांच्या टीका, दूषणांना घाबरून आता मी माझ्या ध्येयापासून विचलित होणार नाही अशा परखड शब्दांत त्या व्यवस्थेला सुनावतात.

*'पोट भरूनी व्यालासी। मज सांडुनी कोठे जासी।। किंवा*
*'अरे विठ्या विठ्या विठ्या।मूळ मायेच्या कारट्या।।*

अशा तीव्र शब्दात त्या विठ्ठलाशीही भांडतात यावरून त्यांच्या आक्रमक,बंडखोर व्यक्तिमत्व, शैलीचा प्रत्यय येतो.

जनाबाईच्या अभंगाचे अंतरंग तथा आशयाबरोबरच त्यांची रचनाशैलीही तितकीच सरस आहे. अर्थपूर्ण सूचक व वेधक शब्दकळा, जाते, दळण, आधण यांसारख्या रोजच्या जगण्यातील प्रतिमा, प्रतीके तसेच भक्तीरस, करूण रस,वत्सल रस आदी रसांचा उत्कर्ष साधणारी अभिव्यक्ती हे त्यांच्या अभंगरचनेचे महत्त्वाचे विशेष होत. याबाबत ह. श्री. शेणोलीकर म्हणतात".. साध्या–सरळ शब्दांत जनाबाई आपला कोणताही भाव व्यक्त करते त्यात कृत्रिमता कुठेच नसते. अकृत्रिम भावाचा व सरळ अविष्कार ह्याच दोन विशेषांनी जनाबाईची अभंगरचना परिणामकारक झाली आहे. बाह्य सजावटीने भावना अलंकृत करण्याचा ती कुठेही प्रयत्न करत नाही."३ यावरून जनाबाईच्या रचनांचे वेगळेपण आपल्या लक्षात येते.

एक निस्सीम विठ्ठलभक्त म्हणून आणि वैविध्यपूर्ण रचना करणाऱ्या कवयित्री म्हणून जनाबाईचे संत साहित्यातील योगदान महत्त्वपूर्ण आहेय मात्र त्यांच्या जीवनाची, चरित्राची झालेली उपेक्षा मन व्यथित करणारी आहे. आपल्या स्त्री जन्माबद्दल त्यांची तक्रार नसली तरी दासी आणि शुद्र जातीतील असल्यामुळे समाजात आणि संत नामदेवांच्या घरातही त्यांचे असलेले स्थान, त्यांना मिळणारी वेगळी वागणूक याबाबतची खंत त्यांच्या अभंगातून प्रकट झालेली आहे. जनाबाईनी अनेक संतांची चरित्रे आपल्या अभंगातून गायली परंतु त्यांचे स्वतःचे चरित्र मात्र संत साहित्यात उपेक्षितच राहिले. त्यांच्या समकालीन अथवा नंतरच्या संत काव्यातही जनाबाईचा फारसा उल्लेख आढळत नाही. एवढेच नव्हे तर ज्या संत नामदेवांच्या घरी त्या दासी म्हणून काम करतात व आपल्या प्रत्येक अभंगात 'नामयाची दासी जनी' अशी नाममुद्रा अभिमानाने मिरवतात त्या नामदेवांच्या अभंगातही जनाबाईवरील विठ्ठल पदक चोरीचा आळ हा प्रसंग वर्णन करणारा

*नामयाचे घरी असे दासी जनी। तिने चक्रपाणी वश केला।*

Copyright © 2020 Authors

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

Sambodhi
(UGC Care Journal)
ISSN: 2249-6661
Vol-43, No.-03 (IX) July-September (2020)

हा एकमेव अभंग वगळता जनाबाईच्या जीवनचरित्राचे फारसे संदर्भ येतांना दिसत नाहीत याचेही आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही.

लौकिक जीवनातील प्रतिमा, प्रतीके, अनुभवांच्या माध्यमातून उच्चकोटीचे अध्यात्मविचार सहजसुंदर, रसाळ आणि प्रेमळ शब्दांत मांडणाऱ्या जनाबाईंचे संत साहित्यातील श्रेष्ठ स्थान कोणीही नाकारू शकणार नाही. एक स्त्री दासी ते संतपदापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरक आहे. वारकरी संप्रदायात जातीभेदाला थारा नाही. आपली जात, वर्ण, व्यवसाय यांचा अडसर न मानता संतसंगती आणि विठ्ठलावरील शुद्ध भाव, भक्ती यांच्या आधारे आपल्याला संतपदापर्यंत पोहोचता येते हा विचार, संदेश त्यांनी आपल्या स्व उदाहरणातून घालून दिला आहे.

संदर्भ :-

1) भिंगारकर,डॉ.दा.वा., संत कवयित्री जनाबाई:चरित्र,काव्य आणि कामगिरी, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. 6 एप्रिल,1989 पृष्ठ 241
2) तत्रैव,पृष्ठ 113
3) शेणोलीकर, हरी श्रीधर (संपा.), नामदेव गाथा, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली. 2013 परिशिष्ट–4, पृष्ठ 146.

.....डॉ. राजाराम अं. झोडगे

PRINCIPAL
Nutan Mahavidyalaya
SELU, Dist. Parbhani

Copyright © 2020 Authors